HAFFKINE INSTITUTE

# हाफकिन संस्थेचा वार्षिक अहवाल

## १९७६-७७

# हाफकिन संस्थेचा १९७६-७७ सालचा वार्षिक अहवाल

सन १८९९ मध्ये हाफकिन संस्थेची स्थापना झाली, त्या वेळेपासून संस्थेने प्लेग कॉलरा, सर्पविष, महारोग वगैरे सांथीच्यारोगावरील संशोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केले आहे संशोधनाखेरीज जीव-वैद्यकीय संशोधन क्षेत्रामध्ये संस्थेने गेल्या अनेक वर्षापासून वैद्यकीय व तत्संबंधीत क्षेत्रांतील कर्मचारी व शास्त्रज्ञांसाठी प्रशिक्षण कार्यक्रमांचा विकास केला आहे.

१९७४ ह्या वर्षात महाराष्ट्र शासनाने हाफकिन संस्थेचे दोन वेगळ्या संस्थांत विघटन करण्याचा निर्णय घेतला. त्यानुसार, हाफकिन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन लिमिटेड ही संस्था व्यापारी पातळीवर जीवक उत्पादनासाठी आणि हाफकिन इन्स्टिटयूट ही संस्था संशोधन प्रशिक्षण व चांचणी ह्या कार्याकरितां स्थापन झाली. दिनांक १४-३-७४ रोजी हाफकिन संस्थेची नोंदणी सोसायटीज रजिस्ट्रेशन अॅक्ट १८६० खाली संशोधन संस्था म्हणून झाली. संस्थेन १ सप्टेंबर १९७५ पासून स्वतंत्र कार्यास सुरवात केली. ही नवोदित हाफकिन संस्था आता तीन महत्वपूर्ण क्षेत्रांत कार्य करते उदा. (अ) सांथीच्या रोगावर संशोधन (ब) वैद्यकीय व संबंधित कर्मचाऱ्यासाठी प्रशिक्षण कार्यक्रम (क) औद्योगिक संस्थानी पाठविलेल्या औषधांच्या व रसायनांच्या चांचण्या.

पूर्वी प्रमाणेच ‘ रोगापहारि विज्ञानं लोककल्याण साधनम् ’ ह्या ध्येयानुसार संस्थेने आपले कार्य जोमाने व उत्साहाने पुढे चालू ठेवले असून मानवी दुखण्यांतून मुक्तता व मानवी कल्याण ही आपली ध्येये ठेऊन संस्था आपले कार्य करीत आहे.

**नियामक मंडळ :-**

‘ नियामक मंडळ ’ ही हाफकिन संस्थेची सर्वोच्च कार्यकारिणी असून तिच्या अध्यक्ष स्थानी महाराष्ट्र राज्याचे आरोग्य मंत्री आहेत. अहवालाचे वर्षी नियामक मंडळाचे सभासद पुढील प्रमाणे होते.

श्री. के. एम्. पाटील, माननीय मंत्री, आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२. — अध्यक्ष

डॉ. लिऑन डिसूझा, माननीय राज्यमंत्री, आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई ३२. — उपाध्यक्ष

श्री. एम. एस. पळनिटकर, सचिव, महाराष्ट्र शासन, नगर विकास आरोग्य विभाग मंत्रालय, मुंबई ३२. — सभासद

श्री. व्ही. प्रभाकर; सचिव, महाराष्ट्र शासन, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई ३२. — सभासद

डॉ. पी. पी. गोयल, महानिर्देशक, आरोग्य सेवा, भारत सरकार, निर्माण भवन, नवी दिल्ली ११. — सभासद

डॉ. एम. के. रांगणेकर, आयुक्त अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, गृहनिर्माण भवन, वांद्रा ( पूर्व ) मुंबई ५१. — सभासद

डॉ. जी एस. मुतालिक, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, महाराष्ट्र शासन, सेन्ट जॉर्जेस हॉस्पिटल परिसर, मुंबई १. — सभासद

डॉ. सी. गोपालन, महानिर्देशक, भारतीय आयुर्विज्ञान अनुसंधान परिषद, अन्सारी नगर, नवी दिली १६. — सभासद

प्रो. टि. के. टोपे, उपकुलगुरु, मुंबई विद्यापीठ, मुंबई ३२. — सभासद

डॉ. सी. जी. पंडित, ४५० सिंध को. ऑपरेटिव्ह हौसिंग सोसायटी, लिमिटेड, गणेशखिंड रोड, पुणे ७. — सभासद

प्रो. आर. चोकसी, बॉम्बे हाऊस, होमी मोदी स्ट्रीट, मुंबई १. — सभासद

डॉ. व्ही. व्ही. कायरकर, संचालक, आरोग्य सेवा, महाराष्ट्र शासन, सेन्ट जॉर्जेस हॉस्पिटल परिसर, मुंबई १. — सभासद

डॉ. भि. ब. गायतोंडे, संचालक, हाफकिन संस्था, परळ, मुंबई १२ — सचिव-सभासद

**संशोधन सल्लागार मंडळ :—**

दिनांक २७–११–१९७४ रोजी नियामक मंडळाने हाफकिन संस्थे मधील संशोधन कार्यात मार्गदर्शन करण्यासाठी आणि झालेल्या प्रगतीचे मुल्यमापन व पाहणी करण्यासाठी संशोधन सल्लागार मंडळाची स्थापना केली. संशोधन सल्लागार मंडळाची या वर्षामध्ये एक बैठक झाली. या बैठकीत हाफकिन संस्थेने केलेल्या संशोधन कार्याचा आढावा घेण्यात आला.

**संशोधन कार्यक्रम :-**

चालू वर्षामध्ये पुढील संशोधन प्रकल्प हाती घेण्यात आले :-

१) जीवरसायन विभागामध्ये रोगनिदान प्रक्रिया मुल्ये तयार करणे. प्रस्तुत प्रक्रिया मुल्यांचा आकृतिबंध तयार झाल्यावर तो शहरी व खेडोपाड्यांतील डॉक्टरांना एसजीओटी एसजीपीटी, रक्त युरीया, कॉलेस्टरॉल इत्यादी महत्वाच्या जीवरसायन परीक्षाणासाठी उपयोगी पडेल. याशिवाय गर्भधारणा निदाना करीता प्रक्रिया मुल्य संच तयार करण्याच कार्य हाती घेण्यात आले आहे. एका व्यक्तिचे रक्त दुसऱ्या व्यक्तिच्या शरीरांत टोचताना एक महत्वाचा धोका म्हणजे सीरम हिपेटायटीस किंवा काविळीचा रक्त संसर्ग होण रक्तदात्यांच्या रक्तामधील ह्या अतिसूक्ष्म जंतूची तपासणी करण्यासाठी प्रक्रिया-संच आकृतिबंध करण्याचे कार्य नुकतेच हाती घेण्यात आलेले आहे. अद्यापपर्यन्त असे प्रक्रिय संच आयात करण्यात येत आहेत.

२) या वर्षी 'सुडोमोनस' नावाच्या जंतूची लस तयार करण्याचा एक महत्वाचा प्रकल्प सुरु करण्यात आला. ह्या जंतूपासून भाजलेल्या रोग्याचा मृत्यू ओढविण्याचा संभव असतो हे जंतू भाजण्यामुळे झालेल्या जखमांतून सापडले असून त्यापासून लस तयार करण्याच प्रयत्न चालू आहेत.

३) स्त्री योनी मार्गातील सर्वसामान्य जीवाणूचे ज्ञान मिळविण्यासाठी दुसरा नवा प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे शस्त्रक्रियेनंतर निर्माण होणारी परिस्थिती उदा. मुल जन्मल्या नंतर 'सेप्सिस' होणे किंवा रोग-संसर्ग होणे, हे एक महत्वाचे संशोधन आहे.

औषधी रसायन विभागामध्ये आतड्यांतील जंतू, कुष्ठरोग, दमा, अमिबायोसिस ह्या रोगजंतूविरुद्ध अनेक रसायने तयार करण्यात आली. अशा जवळ जवळ १८० नव्या रसायनांच संयोगीकरण करण्यात आले.

ह्या विभागाने प्रायोगिक व छोट्या औद्योगिक पातळीवर आयात करण्यात येणाऱ्या मालाच्या उत्पादनासाठी नवनव्या प्रक्रिया विकसित करण्याचे कार्य चालू ठेवले. ह्या प्रक्रिया व्यापारी पातळीवर विकसित केल्यानंतर स्थानिक उद्योजकांना खेड्यांमध्ये मूलभूत औषध उत्पादनांचे विभाग स्थापन करण्यासाठी देण्यात येतील.

बुरशीजन्य रोगांचा आपल्या देशामध्ये फार मोठा प्रादुर्भाव आहे. म्हणून बुरशीज य रोगांच्या म्हणजेच मायकॉटिक संसर्गाचे भारतीय लोकसंख्येतील स्वरुप जाणून घेण्यासाठी एक अ यास कायक्रम ाती घण्यात यत आ

ही संस्था कुष्ठरोग संशोधनांत उत्साहाने कार्य करीत आहे. प्रायोगिक प्राण्यामध्ये कुष्ठरोग जंतू वाढविण्यांत येत असून त्यावरील औषधे तपासण्यांत येत आहेत. कुष्ठरोग्यामध्ये प्रतिकार तंत्राचा अभ्यास करण्यासाठी एक नवा प्रकल्प हाती घेण्यांत आला आहे.

स्वदेशी औषधे वनस्पती संशोधन क्षेत्रांत नवीन औषधे शोधण्यासाठी ही संस्था जोमाने कार्य करीत आहे. संचालकांच्या देखरेखीखाली एका नवीन स्वदेशी औषधावर कुटुंबनियोजन कार्यक्रमासाठी संशोधन चालू आहे. ह्या औषधाचा उपयोग गर्भधारण प्रतिबंधक म्हणून करता येईल. ही औषधी वनस्पती मुख्यतः आदिवासी लोकांमध्ये वापरण्यांत येते व ती आशादायक मार्ग दाखवीत आहे. याशिवाय विशेषतः ॲलर्जी व खोकल्यावर उपाय म्हणून अनेक स्वदेशी औषधांचा अभ्यास औषध शास्त्र विभागांत करण्यात येत आहे.

अतिसूक्ष्म जंतू विभागाने मागील वर्षापासून हेपॅटायटीस या अतिसूक्ष्म जंतूची प्रायोगिक प्राण्यामध्ये वाढ करुन त्यांचे निश्चित स्वरूप काय असावे ह्या संबंधी संशोधन कार्यक्रम जोमाने पुढे चालू ठेवला आहे. हा कार्यक्रम यशस्वी झाल्यावर काविळ ह्या भयंकर रोगावर लस तयार करण्याचा मार्ग सुलभ होईल.

विषशास्त्र ( टॉक्सिकॉलॉजी) विभाग हा देशाच्या या भागातील एकमेव विभाग आहे येथे अनेक प्रकारची कीटक नाशके, अन्नद्रव्ये, प्लॅस्टिक आणि रंगाच्या विष परीणामांचे मुल्यमापन करण्याचे कार्य जोमाने चालू आहे. ह्या विभागाने औद्योगिक समुहांना कामगारांच्या आरोग्यावर होणारे दुष्परीणाम टाळण्यासाठी सल्ला देण्याचे कार्य केले

मलेरीयाची साथ पुन्हा उद्‌भवण्याची चिन्हें दिसत असल्याने संस्थने झूनोसिस विभागांत मलेरिया संशोधन उपविभाग स्थापून ह्या क्षेत्रांत कार्याला सुरवात केली आहे. इतर अनेक प्रकल्प उदा. कृमी, हत्तीरोग, इ. रोगांवर जोमाने संशोधन चालू आहे.

'सिस्टोसोमिॲसिस' ह्या रोगावर नवीन प्रकल्प चालू करण्यात आला. हा क्वचित आढळणारा रोग १९५२ मध्ये रत्नागिरी जिल्हयातील गिमवी ह्या छोट्या खेडेगांवात प्रथम दिसला पुढील वर्षात ह्या रोगाच्या संशोधनाचा सर्वंकष कार्यक्रम हाती घेण्यांत येणार असून रोगाचा संपूर्ण आढावा घेऊन त्याचे निर्मूलन करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

डांस व डांसांच्या अळयांचा नायनाट करण्यांसाठी अनेक स्वदेशी औषधी द्रव्यांचा अभ्यास करण्यांत येत आहे. रोगवाहक नियंत्रण कार्यक्रमाचा एक भाग या दृष्टीने हा प्रकल्प अत्यंत महत्वाचा आहे. कारण डास आणि इतर किटक डी. डी. टी. आणि ह्या सारख्या इतर नाशकद्रव्यां विरुद्ध प्रतिकारक्षम होत असल्याचे दिसून आल्याचें सर्वांना ज्ञात आहे.

सल्लागार मंडळाने ह्या सर्व संशोधन प्रकल्पांची छाननी करून आढावा घेतला असून आतापर्यंत केलेल्या प्रगती बद्दल समाधान व्यक्त केले आहे. तसेच मंडळातील सदस्यानी संस्थे मधील संशोधकांना अनेक महत्वपूर्ण सूचनाही दिल्या आहेत.

**मदत प्रकल्प :—**

गेल्या कित्येक वर्षापासून आय. सी. एम. आर. ने स्थापन केलेले पोलीओमायलायटीस संशोधन पथक ह्या संस्थेमध्ये कार्य करीत आहे. पोलीओमायलायटीस रोगाचा विस्तृत प्रमाणात अभ्यास करणे पथकाचा प्रमुख उद्देश आहे. हाफकिन बायोफार्मास्युटिकल कॉर्पोरेशन लि. मध्य संपूर्ण स्वदेशी उत्पादनाच्या दृष्टीने पोलीओमायलाटीस लस प्रक्रियेचा अभ्यास केला जात आह

भारत सरकारच्या संरक्षण संशोधन विभागाने संस्थेस सर्प अपकर्षण अभ्यास कार्यक्रम ला मदत केली आहे. हा कार्यक्रम संरक्षण-दलाच्या दृष्टीने फार महत्वाचा आहे.

भारत सरकारच्या शास्त्र व तंत्रज्ञान खात्याने ह्या वर्षी एक नवीन प्रकल्प सुरु केला आह कत्तलखान्यातून मिळविलेल्या रसग्रंथीपासून इनश्युलिन व इतर ग्रंथी द्रव्ये तयार करणे हा ह्या प्रकल्पांचा उद्देश आहे. हा प्रकल्प संचालकांच्या प्रत्यक्ष मार्गदर्शन व पर्यवेक्षणाखाली चालू आह ह्ा प्रकल्प आयात उत्पादके वाचविण्याच्या व फुकट जाणाऱ्या पदार्थापासून जीव उत्पादके तयार करण्याच्या दृष्टीने राष्ट्रीय महत्वाचा आहे.

शास्त्र व तंत्रज्ञान खात्याने मदत केलेला दुसरा एक प्रकल्प म्हणजे व्हायरल हेपॅटायटीस प्रकल्प होय. ह्या प्रकल्पाने बरीच प्रगति केली आहे.

गेल्या दोन वर्षात संस्थेमध्ये जीवरसायनशास्त्र व प्रतिक्षमता शास्त्रांच्या निरनिराळ्या क्षेत्रांत सर्प विषांचे फार मोठ्या प्रमाणांत संशोधन झाल्यामुळे भारत सरकारच्या शास्त्र व तंत्रज्ञान खात्याने विष शास्त्र क्षेत्रांत सखोल संशोधन करण्यासाठी एक प्रकल्प मंजूर केला.

विषशास्त्र विभाग अद्यावत करण्याच्या दृष्टीने शास्त्र व तंत्रज्ञान खात्याकडे हाफकिन संस्थेमध्ये पी. एल. ४८० कार्यक्रमाखाली अमेरिकेतील अल्बनी मेडिकल स्कूलच्या टॉक्सिकॉलॉजी विभागाच्या सहकार्याने टॉक्सिकॉलॉजी रिसर्च सेन्टर स्थापन करण्यासाठी एक प्रकल्प सादर करण्यांत आला आहे.

कुष्ठरोग हा एक असाध्य रोग आहे. ह्या रोगाचे प्रतिक्षमता शास्त्राच्या दृष्टीने सखोल संशोधन करण्यासाठी एक नवा प्रकल्प तयार करण्यात आला असून तो शास्त्र व तंत्रज्ञान खात्याकडे पी. एल ४८० कार्यक्रमाखाली अमेरिकेतील मेहरी मेडिकल कॉलेज, नाशव्हिले ह्या संस्थेच्या सहकार्याने एक अभ्यास कार्यक्रम हाती घेण्यासाठी सादर करण्यांत आला आहे.

खेड्यांमध्ये श्वानदंशामुळे होणारा 'रेबीज' रोग ही एक महत्वाची समस्या निर्माण झाली आहे. हाफकिन संस्था गेल्या अनेक वर्षापासून अन्टिरेबीज लस तयार करीत असून सुध्दा अधिक परिणामकारक व सुरक्षित अशी नवी लस तयार करण्याची काळाची गरज आहे. त्यादृष्टीने एक नवीन प्रकल्प हाती घेतला गेला असून त्यामुळे ह्या रोगावर लस तयार करण्यासाठी मेंढ्या मारणे टाळता येईल, ही लस व्हायॅरॉलॉजी विभागामध्ये पेशीजाल संवर्धन पद्धतीने तयार केली जात आहे. ह्या पद्धतीमध्ये खूप मोठी गुंतवणूक आवश्यक असल्याने अर्थ सहाय्यासाठी संस्थेने एक योजना तयार केली असून ती भारत सरकारच्या शास्त्र व तंत्रज्ञान विभागाला सादर करण्यांत आली आहे.

## आंतरराष्ट्रीय परीसंवाद :—

हाफकिन संस्थेने विषे आणि जंतूविषे ह्या विषयांवर एक आंतरराष्ट्रीय परिसंवाद आयोजित केला होता. ह्या परिसंवादांत भारताच्या निरनिराळया भागांतील तसेंच रशिया इंग्लंड जपान, तैवान आणि इस्त्रायल ह्या देशांतील सुमारे १०० शास्त्रज्ञांनी भाग घेतला. ह्या परिसंवादामुळे संस्थेमधील तरूण शास्त्रज्ञांना प्रस्तुत क्षेत्रांतील नामवंत शास्त्रज्ञांपुढे आपली मते मांडून विचार विनिमय करण्याची संधी मिळाली. परिसंवादाचा विस्तृत वृतांत लेखाच्या स्वरुपांत ( Monographs ) बुलेटिन ऑफ हाफकिन इंस्टिटयूट मध्ये लवकरच प्रसिद्ध केला जाईल.

## प्रशिक्षण कार्यक्रम :—

वैद्यकीय व निम-वैद्यकीय कर्मचाऱ्याकरीतां ही संस्था प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करते. ह्या वर्षी कार्यक्रमांत आणखी वाढ करुन मुंबई विश्वविद्यालयाच्या एम्. डी. पदवी परीक्षेपर्यन्त नेण्यांत आला. ह्या पदवी अभ्यासक्रमांत औषध शास्त्र, चिकित्सालयीन विकृती शास्त्र व सूक्ष्म जीवशास्त्र ह्या शाखाचा समावेश केला आहे.

पदव्युत्तर अभ्यास क्रमांसाठी मुंबई, नागपूर, मराठवाडा, पुणें, आणि कोकण कृषी विद्यापीठांची हाफकिन संस्थेस मान्यता आहे. एम.एससी. व पीएच. डी. ह्या अत्युच्च पदव्यासांठी जीवरसायन शास्त्र, उपयोजित जीवनशास्त्र, सूक्ष्मजीवशास्त्र, कार्बनी रसायनशास्त्र, औषधी विज्ञान शास्त्र आणि प्राणिशास्त्र ह्या शाखामध्ये संशोधन सोई उपलब्ध आहे.

चालू वर्षामध्यें एम. एससी. आणि पीएच. डी. ह्या पदव्या करितां प्रबंध यशस्वी रीत्या पूर्ण करून पदवी मिळविलेल्या विद्यार्थ्यांची यादी पुरवणी क्र. १ मध्ये दिलेली आहे. पुरवणी क्र. २ मध्ये मान्यता प्राप्त विश्व विद्यालयीन मार्गदर्शक शिक्षकांची यादी दिली आहे.

संस्थेच्या इतिहासांत प्रथमच मुंबई विश्वविद्यालयाने ह्या संस्थेला सूक्ष्मजीवशास्त्र व जीवरसायन शास्त्रांमध्ये प्रत्येकी ५ विद्यार्थी एम. एससी. (By Papers) पदवी अभ्यास क्रमांकरिता घेण्यास परवानगी दिली आहे. संस्थेमध्ये मुंबई विश्वविद्यालय चा डिप्लोमा इन मेडिकल लॅबॅरेटरी टेक्नॉलॉजीचा (डी. एम. एल. टी) १ वर्षांचा पदवीपत्रक अभ्यासक्रम शिकविला जातो. ह्या शिवाय संस्थेने स्वतःचे ड्रग ॲनालिसिस मध्ये एक व बायोॲस मध्ये एक असे दोन अभ्यासक्रम सुरु केले आहेत. दोन्ही अभ्यासक्रम एकाचवेळी प्रत्यकी दोन सेमिस्टर्समध्ये शिकविले जातात. प्रशिक्षण कार्यक्रम यशस्वीरित्या संपविल्यानंतर उमेदवाराला एक प्रशस्तीपत्रक देण्यांत येते.

चालू वर्षामध्ये "डी. एम्. एल. टी." साठी १५ व "ड्रग ॲनालिसिस साठी ४ व बायोॲसे" साठी ४ विद्यार्थ्यांना प्रशिक्षण दिले गेले.

संस्थेमध्ये उच्च तंत्रज्ञान उपलब्ध असल्याने ३ महिन्याच्या अल्प मुदतीचे प्रशिक्षण कार्यक्रम चिकित्सालयीन विकृतीशास्त्र, चिकित्सालयीन जीवरसायनशास्त्र, औषध चांचणी, लस आणि आंत्रेतर द्रावणे तयार करणे प्रायोगिक प्राण्यांची राखण व निगा राहणे. रक्तपेढी तंत्रज्ञ न किटकशास्त्र व परोपजीवप्राणीशास्त्र ह्या निरनिराळया क्षेत्रांमध्ये आयोजित केले जातात. च रू वर्षामध्ये एकूण १०४ विद्यार्थ्यांनी वरील निरनिराळया शांखामध्ये अल्पमुदतीचे प्रशिक्षण घेतल

## एक नवीन प्रशिक्षण उपक्रम :—

प्रशिक्षणामध्ये एक नवीन उपक्रम म्हणून महाराष्ट्रांतील विशेषतः ग्रामीण भागांतील निम-वैद्यकीय कर्मचाऱ्यांना, प्रयोगशाळा पद्धती व त्यामधील शिस्त ह्या विषयांचे प्रशिक्षण देण्यासाठी प्रथमच एस. एस. सी विद्यार्थ्यांसाठी प्रयोगशाळा तंत्राचा प्रशिक्षण क यक्रम आखण्यांत आला आहे. प्रशिक्षण कार्यक्रम १२ महिने मुदतीचा असून तो पुढील शैक्षणिक वर्षापासून अमलांत येईल.

## वक्तृत्वपूर्ण भाषणे :—

दि. १४ डिसेंबर १९७६ रोजी मेजर जनरल साहिब सिंग सोखी यांचे नांवाने एक व्याख्यान डॉ. आर. जी. नवलकर, मेहरी मेडिकल कॉलेज, नॅशव्हिले, टेनेसी, यु. एस. ए. ह्यानी दिले. व्याख्यानाचा विषय " कुष्ठरोग प्रतिकारशास्त्रामधील कांही अलीकडील प्रगति " होता

## शैक्षणिक मंडळ :—

दिनांक २७–११–१९७४ ला झालेल्या बैठकीत नियामक मंडळाने शैक्षणिक मंडळाची नेमणूक केली. मंडळामध्ये पुढील सदस्य होते.

| | |
|---|---|
| डॉ भि. व. गायतोंडे, संचालक, हाफकिन संस्था, मुंबई. | अध्यक्ष |
| श्री एम. के. रांगणेकर, आयुक्त, अन्न व औषध प्रशासन, महाराष्ट्र राज्य, मुंबई. | सदस्य |
| डॉ जी. एस. मुतालिक, संचालक, वैद्यकीय प्रशिक्षण व संशोधन, मुंबई. | सदस्य |
| डॉ एस. एस. गोठोसकर, औषध नियंत्रक, भारत सरकार, नवी दिल्ली. | सदस्य |
| डॉ एस. एम. वाछा, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, प्रभारी, राज्य आरोग्य प्रयोगशाळा, पुणे. | सदस्य |
| डॉ एम. बी. भिडे, सहाय्यक संचालक, औषध शास्त्र विभाग, हाफकिन संस्था, मुंबई. | सदस्य |
| डॉ एफ. डी. भरुचा, प्रभारी अधिकारी (प्रशिक्षण) हाफकिन संस्था, मुंबई. | सदस्य |

शैक्षणिक मंडळाची चालू वर्षी एक बैठक झाली आणि तिने संस्थेमधील प्रशिक्षण उपक्रमांच्या प्रगतीचा आढावा घेतला.

## शिक्षक मंडळ :—

ह्या वर्षी शिक्षक मंडळाची नेमणूक करण्यात आली. मंडळाची दर तीन महिन्यांनी बैठक होते तीमध्ये संस्थेच्या शिक्षण कार्यक्रमांतील संपूर्ण घडामोडीचा आढावा घेतला जातो. विषशतः प्रत्येक विद्यार्थाने एम. एससी. अथवा पीएच. डी. पदवी अभ्यासक्रमासाठी सादर कलल्या संशोधन प्रबंधांची तपासणी हे मंडळ करते. प्रत्येक विद्यार्थ्याला शिक्षक मंडळापुढे त्याच्या एम. एससी. अथवा पीएच. डी. पदव्यांसाठी निवडलेल्या विषयांवर केलेल्या संशोधनाचा साराश सादर करावा लागतो. शिक्षक मंडळाने मान्यता दिल्यानंतरच सदर विद्यार्थ्यांची एम एससी. किंवा पीएच. डी. अभ्यासक्रमासाठी अधिकृतपणे नोंदणी केली जाते. विश्वविद्यालयाला प्रबंध सादर करण्यापूर्वी तो शिक्षक मंडळापुढे मान्यतेसाठी सादर करावा लागतो. अशा प्रकारची पध्दत अवलंबिल्यामुळे संस्थेमधील संशोधनाचा तसेच विद्यार्थाच्या ज्ञानाचा दर्जा बराच सुधारला आहे.

डॉ. भि. ब. गायतोंडे, संस्थेचे संचालक ह्यांना महाराष्ट्र शासनाकडून उत्कृष्ट विश्वविद्यालयीन शिक्षक म्हणून निवड होण्याचा सन्मान मिळाला.

तसेच त्यांची नॅशनल ॲकॅडमी ऑफ मेडिकल सायन्सेस (इंडीया) चे फेलो म्हणून निवड झाली.

चालू वर्षी डॉ. गायतोंडे ह्यांना कलकत्ता स्कूल ऑफ ट्रापिकल मेडिसिन येथे जे. बी. चाटर्जी यांचे नांवाने ठेवलेल्या वक्तृत्वपूर्ण भाषणासाठी (Oration) आमंत्रित केले गेले.

## चांचणी विभाग –

चांचणी विभागाचे कार्य अनेकपटीने वाढले आहे. किटकनाशक फवारणीमुळे भारतीय जनते वरील विषारी परिणाम अभ्यासण्यासाठी संस्थेने एक खास कार्यक्रम आयोजित केला भारतांतील अशा प्रकारची ही पहिलीच चांचणी असून तिच्या पासून चित्तवेधक माहिती मिळविली. ह्या पथकाने एकूण १,७५७ दारुचे नमुने आणि १,९५७ औषधाचे नमुने तपासले.

## प्रशासन आणि सेवा :—

हाफकिन संस्थेच्या पटावर ६८ शास्त्रज्ञ असून त्यांच्या मदतीस १३८ प्रशासकीय, तांत्रिक आणि प्रयोग शाळा कर्मचारी आहेत.

संस्थेमध्ये दोन मुख्य विभाग आहेत. हे असे (अ) सूक्ष्मजीव शास्त्र विभाग ह्या मध्य जीवाणूशास्त्र, अतिसूक्ष्म जंतूशास्त्र, विकृतीशास्त्र प्रतिक्षमता शास्त्र आणि प्राणिजन्य रोगशास्त्र हे विभाग येतात. प्राणिजन्य रोगशास्त्र विभागामध्ये कीटक-शास्त्र, परोपजीवी विज्ञानशास्त्र, रोग परिस्थिती विज्ञान शास्त्र आणि सर्पशास्त्र असे चार उपविभाग आहेत. (ब) जीवऔषधी विज्ञानशास्त्र विभाग ह्या मध्ये औषधी रसायन शास्त्र आणि औषधीविज्ञान शास्त्र ह विभाग येतात.

मागील कांही वर्षात विषशास्त्र, मानवी औषधी विज्ञानशास्त्र व किरणोत्सग जीवविज्ञान शास्त्र हे नवीन विभाग सुरु करण्यांत आले. ह्या वर्षी परोपजीवी विज्ञान शास्त्र शाखा सुरु करण्यात आली. ह्या शाखेचा विकास स्वतंत्र अशा परोपजीवी विज्ञान शात्र विभागामध्ये करावयाचे ठरविण्यात आलेले आहे, ज्यामुळे ह्या क्षेत्रामध्ये संशोधनाला संधी प्राप्त करुन देणे देशाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचे ठरेल.

चिकित्सालयीन संशोधन विभाग १९७५ मध्यें स्थापन करण्यांत आला व मुंबई महानगर पालिकेच्या सहकार्याने कस्तुरबा हॉस्पिटल मध्ये एक रूग्ण विभाग उपलब्ध करून देण्यांत आला असूनहि संशोधन विभागाचे कार्य अद्यापपर्यन्त सुरू न होण्याचे कारण म्हणजे अनेक प्रयत्न करूनही आम्हाला लायक कर्मचारी वर्ग नेमता आलेला नाही. ह्याशिवाय रूग्णविभागामध्ये कमचारी वर्ग नेमण्या बाबतही कांही प्रशासकीय अडचणी आलेल्या आहेत. ह्या सर्व अडचणीमुळे चिकित्सालयीन संशोधन क्षेत्रांत कार्य सुरु करण्यास न टाळता येणारा विलंब झाला आहे.

संशोधन सल्लागार मंडळ आणि शैक्षणिक मंडळ यांच्या निर्णयांची अंमलबजावणी करणे सचालकाना सुलभ व्हावे म्हणून नियामक मंडळाने एका कार्यकारी समितिची नेमणूक केली. अहवाल वर्षामध्ये खालील सदस्य कार्यकारी समितिमध्ये होते.

| | |
|---|---|
| १] डॉ. भि. ब. गायतोंडे | अध्यक्ष |
| २] डॉ. एम. व्ही. शिरोडकर | सदस्य |
| ३] श्री. वाय व्ही. ठाकरे | सदस्य |
| ४] डॉ. एम. एच. शाह | निमंत्रक |

कार्यकारी समितीच्या वर्षामध्ये ४ बैठक झाल्या.

## मध्यवर्ती उपकरणशास्त्र विभाग :—

हाफकिन संस्थेमध्ये १५–२० वर्षापूर्वी खरेदी केलेली जुनी पण अत्यंत उपयोगी उपकरणे आहत. ह्यातील बरीचशी उपकरणे विस्कळीत झालेली होती. चालू वर्षामध्ये किमती व आयात कलली उपकरणे वेगळी काढून ती उपकरणशास्त्र अभियंत्याच्या अधिकाराखालील एकाच उपकरण-दालनामध्ये ठेवण्यात आलेली आहेत. ह्यामुळे ९०–९५ टक्के उपकरणे वापरामध्ये आणली गेली असून त्यांवरील केवळ दुरुस्ती खर्चच नव्हे तर नुसत्या पडून राहिलेल्या उपकरणांचा उपयोग करण सुलभ झाले.

## अर्थ पुरवठा :—

संस्थेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे. महाराष्ट्र शासनाने सन १९७५–७६ पासून पुढे पांच वर्षापर्यंत दरवर्षी २५ लाख रुपये अनुदान, पुढील १० वर्षात कमी कमी करीत शुन्यावर आणण्याचे ठरविले असून त्यानंतर संस्थेला कोणतीही आर्थिक मदत शासनातर्फे दिली जाणार नाही. हाफकिन बायोफार्मास्युटिकल कॉर्पोरेशन कडून संस्थेला मिळणारे भाडे वरील अनुदानांमधून कमी करण्यांत येते. परिणामी दरवर्षी संस्थेला आपला महसुली व भाडवली खर्च भागविण्यासाठी ठराविक २५ लाख रुपयांचीच मदत होणार आहे. हा २५ लाखाचा आकडा १९७२ मध्ये केलेल्या अंदाजावर आधारित आहे.

गेल्या पांच वर्षात कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्यांत व वेतनामध्ये वाढ झालेली आहे संशोधनासाठी लागणाऱ्या प्राण्यांसाठी होणारा खर्च, कांचेची उपकरणें, रसायन इत्यादींच्या किंमती मध्यें उत्तरोत्तर वाढ होत असल्यामुळें प्रतिवर्षाच्या खर्चामध्यें वाढ होत आहे. ह्या सर्व गोष्टीमुळें संस्थेला अतिशय गंभीर आर्थिक टंचाई भासते व त्यामुळे अनेक प्रकल्पांची प्रगती होऊ शकली नाही तसेंच रसायने व कांच सामान योग्य त्या प्रमाणांत खरेदी करता आले नाही.

गेल्या पांच वर्षात संस्थेला उपकरणांकरितां किंवा संशोधन उपकरणांच्या आधुनिकीकरणासाठी किंवा संशोधन सोयीसाठी जवळ जवळ कांहीच मदत मिळालेली नाही परिणामी संशोधनाचा दर्जा खूपच खालावला. तरी सुद्धा एक आनंदाची गोष्ट नमूद करावीशी वाटते की ह्या वर्षी हाफकिन संस्थेच्या खाली नमूद केलेल्या संशोधन व इतर प्रकल्पांसाठी हाफकिन बायो-फार्मास्युटिकल कार्पोरेशन कडून १८ लाख रुपयांची देणगी मिळाली.

अ ) विषशास्त्र विभागासाठी स्वतंत्र प्राणी गृह उभारणे व योग्य त्या सोयीची तरतूद करण

ब ) क्षय विरोधी औषधाच्या तपासणीसाठी खास जागा बांधणे.

क ) अत्यंत निकडीच्या संशोधन उपकरणांची खरेदी करणे.

वरील प्रमाणें आर्थिक मदतीविना भांडवली खर्च करून संस्थेला कोणताही कार्यक्रम हाती घेणें शक्य झाले नसते.

**ग्रंथालय :—**

हाफकिन संस्थेचे ग्रंथालय भारतांतील सर्वात जुन्या व अत्युत्कृष्ठ वैद्यकीय ग्रंथालयांपैकी एक आहे. जीव वैद्यकीय शास्त्र क्षेत्रांमधील मुंबईतील एक अग्रगण्य संदर्भ ग्रंथालय म्हणून ह्या ग्रंथालयांकडे पाहिले जाते. त्यांत १४,००० जुन्या नियतकालिकांचे अंक सुमारे ७,००० ग्रंथ ३०० चालू नियतकालिके तसेच शास्त्रीय विषयांवरील लेख व अहवाल यांचा उत्तम संग्रह आहे ह्याशिवाय, कॉलरा व प्लेग ह्या महत्वाच्या विषयांवर प्रसिद्ध झालेल्या साहित्याचा एक खास संग्रह ग्रंथालयामध्ये निर्माण केला आहे ग्रंथालयाच्या सोयी केवळ संस्थेमधील शास्त्रज्ञांनाच नव्हे तर इतर संस्थातील शास्त्रज्ञांनाही विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जातात.

गेल्या वर्षापासून ग्रंथालयातर्फे झेरॉक्स कॉपिंग मशीनची सोय करण्यांत आली आहे.

**हाफकिन संस्थेच्या ग्रंथालयास विद्यापीठ अनुदान मंडळाचे साह्य :-**

ग्रंथालयीन सेवा सक्षम करण्यांसाठीं हाफकिन संस्थेला प्रथमच युनिव्हर्सिटी ग्रॅन्टस कमिशनने साहित्य खरेदीसाठी दिलेल्या ५०,००० रुपयांच्या अनुदानाबद्दल तसेंच पुस्तके व नियतकालिके खरेदी करण्यांसाठी मंजूर केलेल्या १ लाख रुपयांच्या मदतीबद्दल हाफकिन संस्था येथें कृतज्ञता व्यक्त करिते.

ग्रंथालय सध्या जुन्या दरबार सभागृहांत आहे. ही जागा ग्रंथालयाच्या दृष्टीने अतिशय असुरक्षित आहे. वाढत्या सोयीच्या दृष्टीने ग्रंथालयासाठी पूर्णपणे स्वतंत्र इमारतीची अत्यंत आवश्यकता आहे. तसेच जुन्या ग्रंथांचे योग्यरित्या जतन करण्यासाठी मायक्रोफिलमची सोय उपलब्ध असणे आवश्यक आहे.. ग्रंथालयाकडे असलेल्या ग्रंथसंपदेचा संग्रह करण्यासाठी संपूर्णपणे स्वतंत्र इमारतीची योजना तयार करण्यात येत आहे.

## रक्त संचरण सेवा :—

संस्थेतर्फे प्रथमच रक्त संचरण सेवा चालू करण्यांत आली. तिचे उद्घाटन नियामक मंडळाचे अध्यक्ष श्री के. एम्. पाटील ह्यांच्या हस्ते १७ आक्टोबर १९७६ रोजी करण्यांत आले. हा उपविभाग गरजू व गरीबांना रक्त संचरणाच्या सोयीचा फायदा मिळावा ह्या दृष्टीने सुरु करण्यांत आला आहे. सेवेचे कार्य डिसेंबर १९७६ मध्ये सुरू झाले असून नियमित संचरणाकरिता अगदी थोड्या रुग्णांची नोंद करण्यांत आली आहे ही मर्यादित सेवा असून लवकरच तिचे रूपांतर आंतररुग्ण सेवेतही करण्यांत येईल. आंतररुग्ण खाटा उपलब्ध असलेला रक्तशास्त्र विभाग उघडण्याच्या दृष्टीने कार्यक्रम आखण्यांत आला आहे.

## समाजकल्याण कार्यक्रम :-

कर्मचाऱ्यांतील नाटय, साहित्य आणि सांस्कृतिक कलागुणांना वाव मिळावा तसेच त्यांच्यातील बंधुभाव वाढीस लागावा ह्या उद्देशाने हाफकिन संस्था सांस्कृतिक मंडळाची स्थापना १५–१–७५ रोजी करण्यात आली.

ह्या मंडळासाठी निधी उभारणे आवश्यक आहे. त्यासाठी नाटके किंवा संगीत रजनी या सारखे कार्यक्रम करणे, स्मरणिका प्रकाशित करणे आणि हितचिंतकांकडून देणग्या गोळा करणे आवश्यक आहे. आजी आणि माजी कर्मचाऱ्यांना ह्या मंडळाचे सभासदत्व खुले आहे.

## क्रिडा मंडळ :—

हाफकिन संस्था क्रिडा मंडळाची स्थापना २–१०–५८ रोजी झाली. ह्यामध्ये १० निरनिराळे भाग असून प्रत्येक भागासाठी वेगळा सचिव आहे. मंडळातर्फे क्रिकेट, बॅडमिंटन, टेबल टेनिस, लॉन टेनिस, कबड्डी, व्हॉली बॉल, कॅरम, बुद्धिबळ आणि ब्रिज ह्या खेळाच्या सोयी आहेत. सभासद ह्या खेळांच्या स्पर्धांमधून भाग घेत असतात.

## समस्या आणि अडचणी :—

गेल्या वर्षाच्या अहवालांत संस्थेला तोंड द्याव्या लागणाऱ्या अनेक समस्यांचा उल्लेख आलेला आहेच. ह्या समस्या अद्यापपर्यन्त सुटलेल्या नाहीत. सन १९६६ पासून असुधारित

एकूण वेतनावर उच्च दर्जाचे शास्त्रज्ञ नेमणे कठीण झाले आहे. येथे हे स्पष्ट करणे आवश्यक आह की संस्थेला पुरेसे पैसे उपलब्ध करुन दिल्याखेरीज उच्च दर्जाचे सखोल संशोधन करणे अशक्य आहे. संशोधनामध्ये गुंतविलेला पैसा ही दीर्घ मुदतीची गुंतवणूक असून योग्य वेळी अशा गुंतवणूकीतून बहुमोल लाभांश प्राप्त होत असतो.

शास्त्रज्ञांना निवासी जागेची सोय उपलब्ध करुन देण्याची समस्या तीव्र बनली आह संस्थेच्या परिसरांत गेल्या ३५ वर्षांत एकाही नवीन घराची बांधणी झाली नाही. वस्तुस्थिति अशी आहे की संस्थेचे दोन स्वायत्त संस्थामध्ये विभाजन होण्यापूर्वी शास्त्रज्ञांना शासकीय इमारतीमध्य जागा मिळत असे. तथापि विभाजनानंतर ही सोय बंद करण्यांत आल्यामुळे व मुंबईसारख्या ठिकाणी खाजगी जागा मिळविणे अशक्यप्राय असल्यामुळे नवीन शास्त्रज्ञ संस्थेकडे आकर्षित होणे अत्यंत अवघड झाले आहे. म्हणून संस्थेच्या परिसरांत किंवा दुसऱ्या सोयिस्कर ठिकाणी निवासाची सोय करण्यासाठी एक संपूर्ण प्रकल्प ताबडतोब हाती घ्यावा लागेल.

गेल्या वर्षीच्या अहवालांत सभागृहाविषयक समस्येचा उल्लेख केला होता. अद्याप संस्थला सभागृह व ग्रंथालय बांधण्यासाठी आर्थिक मदत मिळविण्यांत यश आलेले नाही. त्यामळ परिषदा, परिसंवाद इत्यादी आयोजित करणे अतिशय कठीण झाले आहे. ह्या खेरीज हे अ ग्रहान प्रतिपादन केलेच पाहिजे की, ज्या इमारतीमध्यें ग्रंथालय आहे ती इमारत सुमार २०० वर्षांची जुनी असून दिवसेंदिवस ह्या जुन्या इमारतीत इतका मोठा पुस्तकांचा संग्रह आणि इतर सामुग्री ठेवणे कठीण झाले आहे.

खास उपकरणांशिवाय बरेचसे उच्चस्तरीय संशोधन कार्य होऊ शकले नाही उच्च तत्रज्ञानांत सतत बदल होत असलेल्या सांप्रतच्या स्पर्धा युगामध्ये पुरेशा चांगल्या सेवा सवलती खेरीज संस्थेकडून उच्च दर्जाच्या संशोधन कार्याची अपेक्षा करणे योग्य होणार नाही.

**आभार प्रदर्शन :-**

भरीव आर्थिक मदत दिल्याबद्दल ही संस्था महाराष्ट्र शासनाचे आभार मानते.

मुंबई विश्वविद्यालय व युनिव्हर्सिटी ग्रॅन्टस कमिशनने दिलेली मान्यता पुढे चालू ठेवल्याबद्दल संस्था त्यांची आभारी आहे,

संस्थेच्या वाचनालयाची सेवा सक्षम करण्यासाठी युनिव्हर्सिटी ग्रॅन्टस कमिशनने दिलेल्या १. ५० लाख रूपयांच्या मदतीबद्दल संस्था कमिशनचे आभार मानते.

संस्थेमधील संशोधनाला मदत केल्याबद्दल संस्था भारत सरकारच्या शास्त्र व तंत्रज्ञान विभाग, भारत सरकारच्या संरक्षण विभाग, आय. सी. एम. आर. आणि सी. एस. आय. आर यांचे ही आभार मानते.

आयकर कायदा १९६१ च्या भाग ३५ अन्वये आयकरांतून सुट देण्याचे प्रशस्तिपत्रक दिल्याबद्दल अवायातीवरील आयातकरापासून सूट दिल्याबद्दल ही संस्था भारत सरकारच्या अर्थ खात्याचे आभार मानते.

हाफकिन बायो-फार्मास्युटिकल कॉर्पोरेशन लिमिटेडने दिलेल्या १८ लाख रुपयांच्या भरीव मदतीचा संस्था साभार स्वीकार करीत आहे.

## पुरवणी क्र. १.

१-४-७६ ते ३१-३-१९७७ ह्या कालावधीत एम. एस्सी. आणि पीएच. डी. पदवी मिळविलेल्या विद्यार्थ्यांची यादी

### एम्. एस्सी. पदवी

१) कुमारी मेरी वर्गीस
२) कुमारी एस. बी. हर्डिकर
३) श्रीमती एन्. जे. खेर
४) श्रीमती ए. सी. देसाई
५) श्री. आर. डी. नाबर
६) कुमारी के. डी. वालावलकर
७) श्री. एस. बी. ढोलम
८) श्रीमती व्ही. आर. कामथ
९) श्रीमती यु. ए. सोनुर्लीकर
१०) श्री. ए. एम्. पटेल
११) श्री. एन. टी. जोशी
१२) श्री. पी. एम. कुळहल्ली

### पी. एच. डी. पदवी

१) कुमारी मीरा एस. कुलकर्णी
२) श्री. आर पी. भमारीया
३) डॉ. एच्. जे. मनशारमानी
४) श्रीमती एस. के. एच्. भिन्डे
५) श्री. एम्. के. रांगणेकर

## परिशिष्ट २

## मान्यताप्राप्त पदव्युत्तर शिक्षकांची यादी

| अनुक्रमांक | पदव्युत्तर शिक्षकाचे नाव | मान्यता देण्यात आलेली पदवी | विषय |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | डॉ. भि. ब. गायतोंडे, एम्. डी., | एम्. डी. | औषध शास्त्र |
| | एम्. एस्सी. (मेडिकल), | | औषध शास्त्र |
| | | एम्. एस्सी. | उपयोजित जीवशास्त्र |
| | एफ्. ए. एस्सी. | पी.एच.डी. | जीवरसायनशास्त्र |
| | | एम्.फार्म | औषधशास्त्र |
| २ | डॉ. म. ब. भिडे, | एम्.एस्सी | उपयोजित जीवशास्त्र |
| | एम्. डी. | एम्.फार्म | औषध शास्त्र |
| ३ | डॉ. म. ह. शहा, | एम्.एस्सी | कार्बनी रसायनशास्त्र |
| | एम्. एस्सी.,पी. एच. डी. | पी.एच.डी. | |
| ४ | डॉ. म. वि. ना. शिरोडकर, | एम्.एस्सी | सूक्ष्मजीवशास्त्र |
| | एम्.बी.बी.एस्.,ए.बी.एस्सी.डी. | पी.एच.डी. | उपयोजित जीवशास्त्र |
| | ( जॉन्स हाफकिनस् ) पी.बी. के. | | |
| | ( संयुक्त अमेरिका ) | | |
| ५ | डॉ. सु. मुखर्जी, | एम्. एससी | सूक्ष्मजीवशास्त्र |
| | एम्.बी.बी.एस. | | |
| | एम्.एस्सी. ( मेडीकल ) | | |
| | पी. एच.डी. | | |
| ६ | डॉ. दि. मा. रेनापूरकर, | एम्. एससी | प्राणीशास्त्र |
| | एम्. एस्सी. पी.एच.डी | पी.एच.डी. | उपयोजित जीवशास्त्र |
| ७ | श्री. य. स. निंबकर, | एम्.एससी | सूक्ष्मजीवशास्त्र |
| | एम्.एस्सी ( डिप. बॅक ) मॅंचेस्टर | | |
| ८ | डॉ. क. हि. दवे, एम्. डी., | एम्. एससी | सूक्ष्मजीवशास्त्र |
| | डी. पी. बी. | | |
| ९ | डॉ. फा. लु. सालढाना, | एम्.एससी | सूक्ष्मजीवशास्त्र |
| | एम्. एससी पी.एच. डी. | | उपयोजित जीवशास्त्र |
| | एफ. आय. सी. (कलकत्ता) | | |
| १० | डॉ. श. शां. सबनीस, | एम्.एससी. | कार्बनी रसायनशास्त्र |
| | एम्.एससी. पी.एच.डी. | | |
| ११ | डॉ. अ. ज. बक्षी, | एम.एससी | जीवरसायनशास्त्र |
| | एम. एससी. पी.एच.डी. | पी.एच.डी. | उपयोजित जीवशास्त्र |
| १२ | डॉ. पी. रामकृष्णन् | एम.एससी | जीवरसायनशास्त्र |
| | एम.एससी. पी.एच.डी. | | |
| १३ | डॉ. एस. सी. गद्रे | एम.एससी | सूक्ष्मजीवशास्त्र |
| | एम.एससी. पी.एच.डी. | | |

जे. बी. पालेकर आणि कं.
सनदी लेखापाल

दूरध्वनी : २९०३९१ – २५६४६१
डोल-बिन-शिर, दुसरा मजला,
६९-७१, घोगा स्ट्रीट, मुंबई ४०० ००१

**जोडपत्र 'ब'**

जे. बी. पालेकर, बी.कॉम., एफ.सी.ए.
एस. एस. जोशी, बी. कॉम., [ऑनर्स] एफ.सी.ए.
ए. व्ही. पंडित, बी. कॉम. (ऑनर्स) एफ.सी.ए.

**१९५० च्या बॉम्बे ॲक्ट क्रमांक २९ च्या बाबतीत.**

**( दी बॉम्बे पब्लीक ट्रस्ट ॲक्ट १९५० )**

**हाफकिन संस्था, प्रशिक्षण, संशोधन आणि चांचणीसाठी मुंबई याबाबतीत**

**संदर्भ :–** पब्लीक ट्रस्ट क्रमांक एस-३२५४ ( बॉम्बे ) ३१ मार्च १९७७ रोजी संपल्ल्या वर्षाचे लेखा परीक्षण.

३१ मार्च १९७७ रोजीच्या ताळेबंदाचे त्याचप्रमाणे १ एप्रिल १९७६ ते १९७७ या मुदतीतील उत्पन्नाचा व खर्चाच्या हिशोबाचे आम्ही लेखा परीक्षण केले आणि त्यानुसार आम्हा असा अहवाल देतो की :–

१. बॅंकेच्या विवरणानुसार बॅंकेने खर्ची दाखविलेली २६२८ रुपये ३९ पैशयाची रक्कम व जमा केलेली २१८९ रुपये ६० पैशयाची रक्कम संस्थेच्या हिशेब नोंदणी पुस्तकांत दिसला नाही. कारण ह्या रकमांबद्दलची सविस्तर माहिती मिळाली नाही. अहवालाच्या हिशेबाच्या विवरणपत्राच्या स्थितीत त्याप्रमाणांत परिणाम होईल.

२. संस्थेची उद्दिष्ट्ये इन्कम टॅक्स ॲक्ट १९६१, कलम १० [२१] च्या उपबंधात समाविष्ट करण्यात आलेली नाही.

३. विविध धनकोंच्या खतावणीचा मेळ मुख्य खतावणीतील विविध धनकोंच्या एकत्रित खात्याशी घालण्यांत आलेला नाही. तसा मेळ घालणे जरुरीचे आहे.

४. महाराष्ट्र राज्य शासनाने सदर संस्थेकडे वर्ग केलेल्या स्थावर व जंगम मालमत्तची एकत्रित नोंदवही लिहिण्यांत आलेली नाही. सध्या ठेवण्यांत आलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेच्या विभागवार नोंद वह्यातील किंमतीच्या एकत्रित नोंदवहीशी व मुख्य खतावणीतील स्थावर व जंगम मालमत्तेच्या हिशेबाशी मेळ घालणे जरुरीचे आहे.

५. मागील वर्षी १-९-७५ ते ३१-३-७६ पर्यंतचा घसारा ' रिटर्न डाऊन व्हॅल्यु ' ने आकारण्यांत आला होता. यावर्षी घसारा पुन्हा ' स्टेट लाईन ' पद्धतीने आकारण्यांत आला आहे. घसारा आकारण्याचें पद्धतीत बदल केल्याने १-९-७५ ते ३१-३-७६ या कालावधीकरतां येणारा घसाऱ्यातील फरक १,१७,१०५ रुपये हा चालू वर्षाचे घसाऱ्याचे रकमेत मावि़ष्ट करण्यात आला.

६. चालु हिशेब तपासणीचे वर्षात ' ग्रॅच्युइटी ' करता ७३,९०६ रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. त्यामध्ये १-९-७५ ते ३१-३-७६ या कालावधीच्या ' ग्रॅच्युइटी ' ची तरतूदही समाविष्ट आहे.

**वरील गोष्टी मान्य झाल्यास —**

ए) संस्थेचे हिशेब नियमित व ॲक्ट रुल्सच्या तरतुदी नुसार ठेवलेले आहेत.

बी) हिशेबाच्या पुस्तकांत जमा व संवितरण योग्य रीतीने व बिनचूकपणे दाखविल्या आहेत.

सी) हाती असलेल्या रोकड रकमेचा पडताळा ३१ मार्च १९७७ रोजी करण्यात आला आणि हिशेबाचे पुस्तकाप्रमाणे बरोबर असल्याचे दिसून आले. व्हाउचर्सचा हिशेबाशी मेळ बसला.

डी) जरूर असलेली सर्व पुस्तके, व्हाउचर्स, हिशेब आणि अन्य नोंदी आम्हापुढें सादर करण्यात आल्या.

ई) जंगम व स्थावर मालमत्तेच्या नोंदवह्या व्यवस्थित ठेवलेल्या आहेत. परंतु नोंदवह्यात दाखविलेल्या मुल्यासंबंधी घसारा दाखविलेला नाही.

(एफ) संस्थेचे मानसेवी प्रशासन अधिकारी आम्हापुढे हजर राहिले आणि त्यांनी आम्हांला पाहिजे असलेली सारी माहिती दिली.

जी) ज्या उद्दीष्टासाठी किंवा हेतुसाठी संस्थेची मालमत्ता व निधी घेतला आहे, त्या उद्दीष्टा शिवाय किंवा हेतुबाहेर कोणत्याही मालमत्तेचा वा निधीचा वापर केलेला दिसत नाही.

एच) एक वर्षाहून अधिक काळ अदत्त राहिलेली व निर्लेखित करण्यांत आलेली रक्कम शून्य होती.

आय) दुरुस्तीसाठी किंवा बांधकामासाठी ५,००० रुपयांहून अधिक खर्च येत असल्यास त्यासाठी निविदा मागविण्यात आली होती.

(जे) कलम ३५ मधील तरतुदीच्याविरुद्ध संस्थेचे पैसे गुंतविण्यांत आलेले नाहीत.

(के) ३१ मार्च १९७६ रोजी संपलेल्या काळांत संस्थेतील कोणत्याही स्थावर मालमत्त कलम ३६ मधील तरतुदीच्याविरुद्ध हस्तांतरण केल्याचे आढळून आले नाही.

(एल) कोणत्याही प्रकारचा अनियमित, बेकायदेशीर किंवा अयोग्यरीत्या खर्च क० आढळून आलेले नाही. ट्रस्टचे पैसे वा मालमत्ता वसुल करण्यांत चूक झालेली नाह की ते वगळण्यांत आलेली नाहीत. त्याचप्रमाणे ट्रस्टचे पैसे विनाकारण ख केलेले नाहीत.

(एम) (१) कलम ३१ ए नुसार अंदाजपत्रक दप्तरदाखल करण्यांत आलेला नाही.

(२) नियमाप्रमाणे नियामक मंडळाने सहा महिन्यांतून एक बैठक घेतली पाहिज

(३) बैठका नियमाप्रमाणे घेण्यात येतात,

(४) कार्यवृत्त पुस्तक व्यवस्थितपणे ठेवण्यांत आलेले आहे.

(५) नियामक मंडळाचा कोणीही सभासद संस्थेचा धनको किंवा ऋणको नाही

(६) वरील अहवालात नमूद केलेल्या बाबीखेरीज गेल्या वर्षी आढळून आलेल्या विसंगती योग्य रीतीने दुरुस्त करण्यांत आल्या आहेत.

मुंबई.

१६ नोव्हेंबर १९७७

( स्वाक्षरी )

**जे. बी. पालेकर अँड कंपनी**

सनदी लेखापाल

**अनुसूची-८**

हाफकिन संस्था प्राशिक्षण, संशोधन व चांचणी

## देणे किंवा दायित्व (लायबिलीटीज)

| मागील वर्ष रुपये | | | रु. पै. |
|---|---|---|---|
| | **निकाय** | | |
| १,४२,६५'३३३ | मागील वर्षाच्या ताळेबंदानुसार | १,४२,६५,३३३.०० | |
| | चालु वर्षातील भर | ५५,९४०.०० | |
| | | | १,४३,२१,२७३.०० |
| | **इतर पृथक व राखीव निधी** | | |
| | **कर्मचारी ग्रॅज्युइटीसाठी राखीव** | | |
| | ७'५–७६ व ७६–मधील तरतूद | ७३,९०६.०० | |
| | वजा ७६-७७ मध | | |
| | दिलेली ग्रॅच्युईटी | ४९९.७'५ | |
| | | | ७३,४०६.२५ |
| | **चालू दायित्व** | | |
| १६,७७० | **ठेवी** | | |
| | तारण धनासाठी ठेव ९,५००.०० | | |
| | पुरवठा करणाऱ्या-कडून प्रतिभूति ठेव ५,२५०.०० | | |
| | प्रशिक्षार्थ्यांकडून मिळालेली ठेव १,७९०.०० | | |
| | हाफकिन बायो-फार्मा. का. लि. कडून 'मेट्रोनिडोझोल' या औषधे निर्मितीसाठी तांत्रिक ज्ञान देण्या-विषयी मिळालेली अग्रीम राशी २५,०००.०० | | |
| | | ४१,६४०.०० | |

यासाठी ३१ मार्च १९७७ चा ताळेबंद

## मत्ते ( ॲसेटस् )

**मागील वर्ष**

| रुपये | | | रु. प |
|---|---|---|---|
| १६,२१,००९ | **भूमि :** | | |
| | मागील वर्षातील ताळेबंदानुसार | | १६,२१,००९ ०० |
| ७६,४६,४८६ | **इमारती व बांधकाम :** | | |
| | मागील वर्षाच्या ताळेबंदीनुसार | ७६,४६,४८६.०० | |
| | अधिक चालु वर्षातील भर | १७,०६०.६९ | |
| | | ७६,६३,५४६.६९ | |
| | वजा चालू वर्षातील घसारा | २,३४,११४.०० | ७४,२९,४३२ ६९ |
| २९,९१,०७५ | **सयंत्र व यंत्रसामुग्री** | | |
| | मागील वर्षाच्या ताळेबंदीनुसार | २९,९१,०७५.०० | |
| | अधिक चालू वर्षातील खरेदी | २,३४,३५०.१२ | |
| | अनुदानव्दारा प्राप्त झालेली | ४,८७,६१६.४८ | |
| | | ३७,१३,०४१.६० | |
| | वजा चालू वर्षी केलेले निर्लेखित | १६,०६०.८० | |
| | | ३६,९६,९८०.८० | |
| | वजा चालू वर्षातील घसारा | ३,५२,४७५.०० | ३३,४४,५०५ ८० |
| १०,५४९ | **मोटार वाहने :** | | |
| | मागील वर्षातील ताळेबंदीनुसार | १०,५४९.०० | |
| | अधिक: १-९-७५ पूर्वी खरेदी केलेले | ५५,९४०.०० | |
| | | ६६,४८९.०० | |
| | वजा, चालू वर्षीचा घसारा | ११,२१३.०० | ५५,२७६ ०० |
| २,१०,४४५ | **फर्निचर आणि फिकस्चर** | | |
| | मागील वर्षाच्या ताळेबंदीनुसार | २,१०,४४५.०० | |
| | अधिक: चालु वर्षातील भर | १८,६१५.५२ | |
| | | २,२९,०६०.५२ | |
| | वजा : चालु वर्षी केलेले निर्लेखित | १,१५०.९९ | |
| | | २,२७,९०९.५३ | |
| | वजा : चालु वर्षाचा घसारा | १२,६३०.०० | २,१५,२७९ ५३ |

| | | | |
|---|---|---|---|
| २,६३,४९२ | **धनको** | | |
| | खरेदी व दुरुस्ती साठी नानाविध धनकी | १,९९,५२४.६९ | |
| | पगार, प्रवास भत्ते लेखा परिक्षेचे शुल्क, इत्यादी नानाविध धनको | २,६९,५४२.७८ | ४,६९,०६७.४७ |
| | ७६-७७ वर्षाची मिळालेली भाडेपट्टी पुढील वर्षातील अनुदानातून वजा करणे | ९,२५,३८३ ०० | १४,३६,१९०.४७ |
| | **प्राप्तीचा व खर्चाचा हिशेब** | | |
| ९,५८,५७८ | मागील वर्षाच्या ताळेबंदानुसार | ९,५८,५७८.०० | |
| | अधिक प्राप्ती व खर्चाच्या हिशेबातील फरक | ११,४२,६९९.११ | |
| | | | २१,०१,२७७.११ |
| १,५५,०४,१७३ | | | १७९,३२,०४६.८३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२,६१३ | **भंगूर वस्तू :** | | | |
| | मागील वर्षाच्या ताळेबंदीनुसार | | १२,६१३.०० | |
| | वजा चालु वर्षी केलेले निर्लेखित | | १५७.७६ | |
| | | | १२,४५५.२४ | |
| | वजा चालू वर्षाचा घसारा | | १२,४५५.२४ | |
| १ २४,९२,१७७ | | | | १,२६,६५,५०३ ० |
| १,४५,७३० | **टिकाऊ वस्तू** | | | |
| | मागील ताळेबंदीनुसार | | १,४५,७३०.०० | |
| | अधिक : चालु वर्षातील भर | | ६४३.५७ | |
| | | | १४६,३७३.५७ | |
| | वजा : चालु वर्षी निर्लेखित | | ९९.२१ | |
| | | | १,१४६,२७४.३६ | |
| | चालु : वर्षातील घसारा | | १९,८६५.०० | १,२६,४०९ ३६ |
| १५,८७,६०३ | ग्रंथालयातील पुस्तकें | | | |
| | मागील वर्षातील ताळेबंदीनुसार | | १५,८७,६०३.०० | |
| | अधिक चालु वर्षातील भर | | २,५३,६४१.१४ | १८,४१,२४४ १४ |
| | **चालू मत्ते** | | | |
| १९,११५ | **अग्रीम धन** | | | |
| | उत्सवासाठी अग्रीम धन | ३,१५९.०० | | |
| | प्रवासभत्यासाठी अ.धन | १,३५०.७५ | | |
| | विभागाना दिलेले अग्रीम धन | २१,६००.०५ | २६,१०९.८० | |
| | **अगाऊ केलेला खर्च** | | | |
| | रोख रकमेचे वहातुकीच्या विम्याकरतां | १०२.३८ | | |
| | वाहनाच्या विम्याकरिता | १,०८८.९० | १,१९१.२८ | |
| ५,६५,०८८ | भाडेपट्टी, चाचणी शुल्क, विक्र-विक्री वगैरे बद्दलचे विविध ऋणको | | ३,८८,४०४.८५ | |
| | या संस्थेचे सेवेत समाविष्ट करण्यात आलेल्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या खाती ३१-८-७५ ला शिल्लक असलेल्या हक्काच्या रजेच्या पगारापोटी महाराष्ट्र राज्य शासनाकडून येणे असलेली रक्कम | | १,४९,५५९.६० | |
| ७५३ | युनेस्को कुपन्स | | ७५३.०० | |

**मागील वर्ष**

| | |
|---|---|
| १,५५,०४,१७३ | १७९,३२,०४६.८३ |
| १,५५,०४,१७३ | १,७९.३२,०४६.८३ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५,२५० | **ठेवी** | | | |
| | टपाल खात्याच्या प्राधिका-ऱ्याकडे असलेल्या पुरवठा करणाऱ्यांच्या ठेवी | ५,२५०.०० | | |
| | २४-३-७७ रोजी मीटर दुरुस्ती करतां बी. ई.एस.टी. कडे दिलेली अनामत रक्कम | ३५.०० | | |
| | विजेच्या ११ मीटर्स करता २३-११-७६ रोजी बी. ई. एस. टी. ला दिलेली अनामत रक्कम | ३८,४१५.०० | ४३,७००.०० | ६,०९,७१८ ५३ |
| १४८,१५,७१६ | | | | १,५२,४२,८७५ ०५ |
| १,४७,१८० | अखेरचा रोखा उपभोग्य भांडाराचा | | | १ ९७,१२६ ८५ |
| ५,३६,८७७ | **रोकड व बँकेतील शिल्लक** | | | |
| | ३१-३-७७ ची रोख शिल्लक | | | |
| | कॅश बुक प्रमाणे | | ७,८५०.२० | |
| | पेटी कॅश बुक प्रमाणे | | ०.७१ | |
| | कॅनरा बँकेतील चालु खात्यातील शिल्लक | | २४,६८,८९४ ०२ | |
| | आयातीकरता केनरा बँकेत उघडलेल्या लेटर्स ऑफ क्रेडिट मधील शिल्लक | | १५,३००.०० | २४,९२,०४४ ९३ |
| ४,४०० | शासनाकडे असलेली वैयक्तिक हिशेबाची खतावणी | | | |
| १,५५,०४,१७३ | | | | १७९,३२,०४६ ८३ |

आम्ही याद्वारे असे प्रमाणपत्र देतो की लागू नसलेल्या बाबी शून्य असल्याने त्या वरील अनुसूचित दर्शविलेल्या नाहीत.

आमच्या याच तारखेच्या अहवालाप्रमाण

मुंबई : १६ नोव्हेंबर १९७७

(स्वाक्षरी) **जे. बी. पालेकर आणि क**

सनदी लेखपाल

**अनुसूची**

हाफकिन संस्था प्रशिक्षण, संशोधन व चांचणी

३१ मार्च १९७७ रोजी संपलेल्या

| मागील वर्ष रुपये | खर्च | | रु. पै. |
|---|---|---|---|
| १,२७,०८० | **स्थावर मालमत्तेवर झालेला खर्च** | | |
| | भाडे, भाडेपट्टी आणि कर व शुल्क | १७,७५४.४७ | |
| | इमारतीचा विमा | २,१४३.६२ | |
| | दुरुस्ती व परिरक्षण | ६४,५३०.४२ | |
| | घसारा | २,३४,११४.०० | ३,१८,५४२.५१ |
| ७,६५,४१४ | **आस्थापना खर्च** | | |
| | संचालकांचे वेतन | ५६,०८५.०० | |
| | कर्मचाऱ्यांचे वेतन | १४,०२,८६९.१६ | |
| | कामगार भविष्य निर्वाहनिधी व कुटुंब पेन्शन निधीकरता संस्थेची वर्गणी | १,३५,३८६.१० | |
| | कामगार भविष्य निर्वाहनिधी कायद्याप्रमाणे द्याव्या लागणारे इतर आकार | ६,१३९.८४ | |
| | कामगार कल्याण | १९,१०७.५९ | |
| | प्रवास खर्च | ३०,७१४.७८ | |
| | सरकारी निवासस्थानांचे भाडे व सेवा आकार | ३२,०१२.६५ | |
| | जाहिरात | ९,५५४.१२ | |
| | दूरध्वनीवरील खर्च | ३७,५७३.९५ | |
| | टपाल खर्च | १६,८३६.२७ | |
| | लेखन सामग्री व फार्म छपाई | १८,२९९.२८ | |
| | गाडी भाडे | २,५७४.०५ | |
| | ग्रॅच्युइटी करता तरतूद | ७३,९०६.०० | |
| | इतर खर्च | ९१४.२१ | १८,४१,९६९.०० |
| ४,३७५ | **लेखा परीक्षा शुल्क** | | ७,५००.०० |
| १,२८० | **निरुपयोगी जंगम वस्तुचे निर्लेखन** | | १७,४६८.७६ |
| १२,०४७ | **इतर खर्च** | | २२,१०६.५५ |
| ९९,४०७ | **इतर मत्तांवरील घसारा** (इमारतीवरील घसारा सोडून) | | ४,०८,६३८.२४ |
| १०,०९,६०३ | | पुढे चालू | २६,९६,२२५.०६ |

१

यासाठी, परळ, मुंबई.

वर्षातील उत्पन्नाचा व खर्चाचा हिशेब

| मागील वर्ष रुपये | प्राप्ती | | रु. पै. |
|---|---|---|---|
| १४,५६,००० | **सहायक अनुदान** | | |
| | १९७६–७७ या वर्षाकरता मंजूर झालेले | २५,००,०००.०० | |
| | १९७६–७७ चे अनुदानाची रक्कम काढताना १९७५–७६ करता मिळालेल्या भाडेपट्टीची वजावट | ३,५५,२४५.१० | |
| | १९७६–७७ मध्ये कोषागारातून काढलेले अनुदान | १९,६४,७५४.९० | |
| | अनुदानातून वजा करावयाची १९७६–७७ ची भाडेपट्टी | ९,२५,३८३.०० | १०,३९,३७१.९० |
| | **हाफकिन जीव औषध निर्माण महामंडळाकडून मिळालेली देणगी** | १८,००,०००.०० | |
| | **इतराकडून मिळालेल्या देणग्या** | | |
| | सिटीझन्स डिफेन्स कमिटीकडून देणगी दाखल मिळालेल्या २ आयात केलेल्या लायफोलायझर्सची किंमत | ४,८७,६१६.४८ | २२,८७,६१६.४८ |
| ९,१५,५७८ | **इतर साधनाने होणारी प्राप्ती** | | |
| | भाडेपट्टीवर दिलेल्या भूमिचे व इमारतीचे भाडे | ७,६९,६५४.०० | |
| | भाड्याने दिलेल्या स्वयंत्रांचे व साधन सामग्रीचे भाडे | १,५५,७२९.०० | |
| २३,७१,५७८ | पुढे चालू | | ३३,२६,९८८.३८ |

| मागील वर्ष रुपये | खर्च | | रु. पै. |
|---|---|---|---|
| १०,०९,६०३ | मागील पानावरून | | २६,९६.२२५.०६ |
| ४,०३,३९७ | **विश्वस्तमंडळाच्यां उद्दिष्टांसाठी झालेला खर्च** | | |
| | वीज व वीजच्या साधनांवरील खर्च | २,८८,१२९.६३ | |
| | वायू इंधनावरील खर्च | ४४,८२८.२७ | |
| | पाणी आकार | ५२,३४९.१७ | |
| | संयंत्रसामग्रीची दुरुस्ती व परिरक्षण | १,१६,०५३.२४ | |
| | संयंत्र व यंत्रसामग्रीचे विम्याचा खर्च | ६,१५०.२२ | |
| | प्राणी व प्राण्यांचे अन्न यावरील खर्च | २,२७,६८०.०८ | |
| | वापरलेली रसायने व औषधे | १,१८,३२६ २३ | |
| | काचसामान व 'सर्जिकल' वस्तूंचा वापर | २९,०१४.३० | |
| | इतर उपभोग्य वस्तूंचा वापर | १,३६,७९६ २८ | |
| | शिष्यवृत्या | ९२५.८० | |
| | वाहनांच्या परिरक्षणाचा खर्च | १७,२६४ १९ | |
| | विश्वस्तमंडळाच्या उद्दिष्टांसाठी झालेला इतर खर्च | ९,७८३ २६ | १०,४७,३ ०.६७ |
| ९,५८,५७८ | ताळेबंदात वर्ग करण्यांत आलेली शिल्लक | | ११,४२,६९९.११ |
| २३,७१,५७८ | | | ४८,८६,२२४ ८४ |

| मागील वर्ष रुपये | प्राप्ती | | | रु. पै. |
|---|---|---|---|---|
| २३,७१,५७८ | मागील पानावरून | | | ३३,२६,९८८ ३८ |
| | निवासस्थानाचे व बंगल्याचे भाडे | | | |
| | अ) हा. बा. फा. कॉं. लि. कडून | १,८०,२६४.२० | | |
| | ब) हाफकिन संस्थेच्या कर्मचाऱ्याकडून | १७,५७५.०५ | १,९७,८३९.२५ | |
| | वसतिगृह भाडे | | १५,३६०.०० | |
| | प्रशिक्षणाचे शुल्क | | ५७,९४०.०० | |
| | संशोधन आकार | | ४९,२००.०० | |
| | चाचणीचे शुल्क | | २,५०,४८१.४७ | |
| | एकूण आकारलेली फी | ३,७१.०००,९५ | | |
| | वजा : 'स्पेसीमन फी' खाती वर्ग | १,२०,५१९.४८ | | |
| | विषाची विक्री | | ४८,६१९.५८ | |
| | इतर किरकोळ प्राप्ती | | १४,४१३.१६ | १५,५९,२३६.४६ |
| २३,७१,५७८ | | | | ४८,८६,२२४.८४ |

आम्ही याद्वारे असे प्रमाणपत्र देतो की, लागू नसलेल्या बाबी शून्य असल्याने त्या वरील अनुसूचित दाखविलेल्या नाहीत.

आमच्या याच तारखेच्या अहवाला प्रम णे

( स्वाक्षरी ) जे बी. पालेकर आणि कं
सनदी लेख पाल

मुंबई : १६ नोव्हेंबर १९७७

## अनुसूची ९-क

( पाहा — नियम ३२ )

## ३१ मार्च १९७७ रोजी संपणाऱ्या वर्षी भरण्यास पात्र असलेल्या उत्पन्नाचे विवरणपत्र

पब्लीक ट्रस्टचे नांव व नोंदणी क्रमांक — हाफकिन संस्था, प्रशिक्षण, संशोधन व चांचणी यासाठी [ नोंदणी क्रमांक एस्-३२५४ (मुंबई) ]

| | | रुपये | पैसे | रुपये | पैसे |
|---|---|---|---|---|---|
| १ | उत्पन्नाच्या व खर्चाच्या हिशेबात (अनुसूची ९) दाखविल्याप्रमाणे उत्पन्न. | | | ४८,८६,२२५ | ०० |
| २ | नियम ३२ व कलम ५८ च्या अन्वये भर घालताना आकारता न येण्यासारख्या बाबी— | | | | |
| | १ अन्य सार्वजनिक विश्वस्तांकडून व धर्मादाय संस्थांकडून मिळालेल्या देणग्या. | | | | |
| | २ शासन आणि स्थानिक प्राधिकाऱ्यांकडून मिळालेली अनुदाने. | २५,००,००० | .०० | | |
| | ३ कर्जनिवारण किंवा घसाऱ्याच्या निधीवरील व्याज. | | | | |
| | ४ दीर्घकालीन शिक्षणासाठी खर्च केलेली रक्कम् | | | | |
| | ५ वैद्यकीय परिहारासाठी खर्च केलेली रक्कम | | | | |
| | ६ जनावरांच्या पशुचिकित्सेसाठी खर्च केलेली रक्कम | | | | |
| | ७ दुर्भिक्ष, आवर्षण, पूर, आग किंवा अन्य नैसर्गिक आपत्तींच्या निवारणार्थ खर्च केलेली रक्कम. | | | | |
| | ८ शेतकीसाठी वापरलेल्या जमिनीच्या उत्पन्नात सूट :— | | | | |
| | अ) भूमी महसूल आणि स्थानिक निधी उपकर, | | | | |
| | ब) वरच्या जमीन मालकाला देय भाडे, | | | | |
| | क) विश्वस्तांना जमीन कसलेली असल्यास उत्पादनाची किंमत. | | | | |

| | | |
|---|---|---|
| (९) शेतीखेरीज अन्य कारणासाठी जमिनीचा वापर केल्यास मिळणाऱ्या उत्पन्नात सूट— | | ४८,८६,२२५ ०० |
| (अ) मूल्यनिर्धारण, उपकर आणि शासनाचे व नगरपालिकेचे इतर कर. | १७,७५४.०० | |
| (ब) वरच्या जमीन मालकास देय असलेले जमिनीचे भाडे. | | |
| (क) विम्याचे हप्ते. | | |
| (ड) इमारतींच्या एकूण भाड्याचा १० टक्के दुरुस्ती खर्च | ७६,९६५.०० | |
| (ई) भाड्याने दिलेल्या इमारतींच्या एकूण भाड्याच्या ४ टक्के दराने भाडे गोळा करण्याचा खर्च. | ३०,७८६.०० | |
| (१०) उत्पन्न किंवा कर्जरोख्यांच्या पावत्या, रोख्यांच्या पावत्या गोळा करण्याचा खर्च अशा उत्पन्नांच्या १ टक्का दराने. | | |
| (११) भाड्याने न दिलेल्या आणि काहीही उत्पन्न न देणाऱ्या इमारतींच्या दुरुस्तीपायी केलेल्या रकमेवर सूट, मूल्यांकन केलेल्या एकूण वार्षिक भाड्याच्या १० टक्के दराने आकारता येण्यासारखे. | | २७,०५,५०५ ०० |
| एकूण—वार्षिक उत्पन्न | | २१,८०,७२० ०० |

"असे प्रमाणपत्र देण्यात येत आहे की, वरील अनुसूचिच्या अन्वये अनुज्ञेय असलेली सूट मागताना वरील अनुसूचितील कोणत्याही बाबींविरुद्ध दुहेरी सुटींचा फायदा मिळावा अशा तऱ्हेने आम्ही कोणतीही रक्कम संपूर्णपणे किंवा अंशतः दोनदा मागितलेली नाही."

(स्वाक्षरी)

**जे. बी. पालेकर आणि कं.**

सनदी लेखापाल

लेखापरीक्षक

दिनांक, १६ नोव्हेंबर १९७७